# महाराष्ट्र शासन

# अल्पसंख्याक विकास विभाग

# मंत्रालय

# नागरिकांची सनद

# (दि.३०.११.२०२२ पर्यंत सुधारित)

# नागरिकांची सनद

## प्रस्तावना

महाराष्ट्र राज्यातील एकूण ११.२२४ कोटी लोकसंख्येपैकी सुमारे २० टक्के लोकसंख्या अल्पसंख्याक समाजातील आहे. मुस्लिम, बौद्ध, ख्रिश्चन, सिख, जैन व पारशी या धार्मिक समुहांना दिनांक ०६.१०.२००६ च्या शासन अधिसूचनेन्वये तर ज्यु या धार्मिक समूहाला दि.०२.०७.२०१६ अधिसूचनेन्वये अल्पसंख्याक समाज म्हणून शासनाने घोषित केलेले आहे. अल्पसंख्याक समाजाच्या विकासाठी असलेल्या राज्यातील कल्याणकारी योजना वेगवेगळ्या प्रशासकीय विभागाद्वारे राबविण्यात येत होत्या. या योजना प्रभावीपणे व कालबद्धपणे राबविण्यासाठी आणि गतीमान करण्यासाठी, तसेच सच्चर समितीने अल्पसंख्याक समाजाविषयी केलेल्या शिफारशी राज्य शासनाने स्वीकारुन त्याची अंमलबजावणी करण्याचे दृष्ठीने शासनाने दिनांक २१.०२.२००८ रोजीच्या शासन अधिसूचनेन्वये नव्याने स्वतंत्रपणे अल्पसंख्याक विकास विभाग निर्माण करण्यात आला आहे.

अल्पसंख्याक विकास विभागाच्या नियंत्रणाखाली असलेली कार्यालये पुढीलप्रमाणे आहेत :-

१) महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई
२) महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद
३) महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण, औरंगाबाद
४) महाराष्ट्र राज्य हज समिती, मुंबई
५) मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ, मुंबई
६) महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमी, मुंबई
७) महाराष्ट्र राज्य पंजाबी साहित्य अकादमी, मुंबई

अल्पसंख्यांक विकास विभागांतर्गत उपलब्ध सेवाचा तपशील त्या पुरविण्यासाठी आवश्यक ती कालमर्यादा, सेवा पुरविणारे कार्यालये व अधिकारी, सदरचा लाभ मिळण्यास अडचणी निर्माण झाल्यास नागरिकांना संपर्क साधण्यासाठी संबंधित अधिकारी इत्यादी माहिती दर्शविणारी सोबतची नागरिकांची सनद तयार करण्यात आली आहे. त्यामुळे अल्पसंख्याक विकास विभाग अधिक गतिमान, पारदर्शक, जबाबदार व लोकाभिमुख होण्यास मदत होईल.

## २. अल्पसंख्यांक विकास विभागाची रचना

मा. मुख्यमंत्री महोदय हे या विभागाचे प्रभारी मंत्री असून त्यांच्या अधिपत्याखाली सचिव हे वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी आहेत. या विभागांकडील सर्व विषयांची विभागणी एकूण ९ कार्यासनांमध्ये करण्यात आलेली आहे.**(परिशिष्ट-१ सोबत जोडले आहे.)**

३. <u>कार्यपूर्तीचे वेळापत्रक</u>

अल्पसंख्याक विकास विभागामार्फत पुरविण्यात आलेल्या सेवांच्या कार्यपूर्तीचे वेळापत्रक परिशिष्ट-२ येथे सादर करण्यात आलेले आहे.

४. <u>नियम/शासन निर्णय</u>

या विभागाशी संबंधित नियम अथवा महत्वाचे शासन निर्णय www.mdd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. या विभागाकडून वेळोवेळी निर्गमित होणारे नियम तथा शासन निर्णयाबाबतची माहिती www.mdd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर अद्यावत करण्यात येते.

५. <u>(अ) गाऱ्हाणी/तक्रारी यांचे निराकरण</u>

कार्यपूर्तीस होणारा विलंब वा अन्य काही गाऱ्हाणी असल्यास त्यासंबधी परिशिष्ट-२ मध्ये नमूद केलेल्या अधिकाऱ्यांकडे तक्रार नोंदविता येईल व तक्रार प्राप्त झाल्यापासून ७ दिवसांत त्याची पूर्तता करण्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांची राहील. यानंतरही नागरिकांचे समाधान न झाल्यास संबंधित अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव तथा संचिवांकडे याबाबत त्यांना तक्रार करता येईल. गाऱ्हाणी समक्ष भेटीत/पत्राने तथा ई-मेलद्वारेही मांडता येतील.

<u>(ब) नागरिकांच्या सनदेचा आढावा/सिंहावलोकन</u>

या नागरिकांच्या सनदेच्या उपयुक्ततेबाबत तथा परिणामकारकतेचा आढावा अल्पसंख्याक विकास विभागाकडून दरवर्षी घेण्यात येईल व त्यात आवश्यकतेनुसार बदल करण्यात येतील.

(क) <u>जनसामान्यांकडून सूचना</u>

ही नागरिकांची सनद सर्वसामान्य नागरिकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असेल व सन्माननीय नागरिकांच्या बहुमूल्य सूचनांचा गांभीर्यापूर्वक विचार करुन त्यात वेळोवेळी सुधारणा घडवून आणता येतील. अल्पसंख्याक विकास विभागाच्या अधिनस्त येणाऱ्या सेवा उपभोगणाऱ्या नागरिकांना आपले हक्क मांडण्यासाठी सनद नेहमीच सहकार्य करेल.

६. <u>नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी</u>

अल्पसंख्याक विकास विभाग नागरिकांच्या या सनदेची अंमलबजावणी करण्यास कटिबध्द आहे. अल्पसंख्याक विकास विभाग आपल्या अधिपत्याखालील सेवा कर्तव्यभावनेने व कार्यतत्परतेने उपलब्ध करुन देण्याची हमी देत आहे. या सेवा पुरविताना नागरिकांना सौजन्यपूर्ण वागणूक देण्याची जबाबदारी विभागातील प्रत्येक अधिकारी/कर्मचाऱ्यांची राहील.

## परिशिष्ट - १
## अल्पसंख्यांक विकास विभाग
## मंत्री/राज्यमंत्री/ सचिव (अ.वि.वि.)

| कार्यासन क्रमांक | विषय |
|---|---|
| कार्यासन १. | **आस्थापना (खुद्द) :-**<br>१) प्रशासकीय विभागाची आस्थापना,२) रजा, प्रशिक्षण ३) गोपनीय अभिलेख, ४) रचना व कार्यपद्धती, ५) गोपनीय शाखा ६) विभागाच्या नियंत्रणाखाली क्षेत्रिय कार्यालयांची स्थापना करणे.<br>७) अल्पसंख्याक विकास विभागाच्या आस्थापनेवरील सर्व अधिकारी/कर्मचारी यांच्या आस्थापनाविषयक व सेवाविषयक बाबी.<br>८) विभागातील व विभागाच्या अधिपत्याखालील कार्यालये / विभाग प्रमुखाचे वित्तीय व प्रशासकीय अधिकार प्रदानाचे प्रस्ताव तपासून मान्यता देणे.<br>९) विभागातील सर्व कार्यासनांकडून विविध मासिक अहवाल मागविणे. |
| कार्यासन २. | **रोख उपशाखा :-**<br>१)रोख शाखा, २) सेवापुस्तकांच्या सर्व नोंदी व जतन करणे व ३) लेखा परीक्षा<br>४) अल्पसंख्याक विकास विभागातील अधिकारी/कर्मचारी यांची वेतन देयके आहरण व संवितरण.<br>५) खर्चाचा ताळमेळ घालणे.<br>६) विनियोजन लेख्याबाबतची माहिती तयार करणे.<br>७) गट-ड कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीचे लेखे ठेवणे.<br>८ प्रलंबित निरीक्षण अहवाल / परिच्छेद.<br>९) नागरी अहवाल.<br>१०) महसूली जमा अहवाल. |
| कार्यासन ३. | **समन्वय कक्ष :-**<br>१)नोंदणी शाखा, २) टपाल आवक/जावक, ३) गृह व्यवस्थापन, ४) अभिलेखांचे जतन, ५) केंद्र शासनाच्या अति महत्त्वाच्या व्यक्तींसाठी राजशिष्टाचार देण्याबाबतची प्रकरणे, ६) विधानमंडळ कामकाज समन्वय, ७) विधानमंडळ समित्या, ८) लोकलेखा समिती संबंधीचे कामकाज.<br>९) समन्वय कक्ष<br>१०) शासकीय वाहने व त्यांचे वाहनचालक.<br>११) लेखन सामग्रीचा पुरवठा करणे.<br>१२) मा.राज्यपालांना सादर करावयाचा एकत्रित मासिक अहवाल.<br>१३) विभागातील इतर संकिर्ण विषय |
| कार्यासन ४. | १)महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे संनियंत्रण आणि वक्फ अधिनियम, १९९५ मधील तरतूदीनुसार सर्व कामकाज व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे.<br>२) महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरणाचे प्रशासकीय सनियंत्रण करणे.<br>३) राज्यात उर्दू घरांची उभारणी व उर्दु घरांचा वापर, देखभाल व दुरुस्तीसंदर्भातील व्यवस्थापन व सनियंत्रण.<br>४) महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमीचे प्रशासकीय सनियंत्रण करणे. |
| कार्यासन ५. | १) राज्यातील अल्पसंख्याकांकडून चालविण्यात येणाऱ्या शैक्षणिक संस्थांना धार्मिक/भाषिक अल्पसंख्याक संस्था म्हणून मान्यता प्रदान करणे. |

| | |
|---|---|
| | २) महाराष्ट्र राज्य हज समितीचे शासकीय स्तरावरील संनियंत्रण आणि समन्वयन.<br>३) राष्ट्रीय अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था आयोग, राष्ट्रीय धार्मिक व भाषिक अल्पसंख्याक आयोग, आयुक्त, भाषाजात अल्पसंख्याक यांच्या शिफारशींवरील कार्यवाही.<br>४) महाराष्ट्र राज्य पंजाबी साहित्य अकादमीचे सनियंत्रण.<br>५) मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे शासकीय स्तरावरील सनियंत्रण आणि समन्वयन |
| कार्यासन ६. | १) अल्पसंख्याक विद्यार्थी बहुल शाळांना पायाभूत सुविधांसाठी सहायक अनुदान योजना. २) उच्च व्यवसायिक व इयत्ता १२ वी नंतर शिक्षण घेणाऱ्या सर्व अभ्यासक्रमांमधील विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना ३) डॉ. झाकिर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना. ४) **केंद्र पुरस्कृत शिष्यवृत्ती योजना (समन्वय)** (अ) गुणवत्ता-नि-साधन आधारित शिष्यवृत्ती योजना, (ब) पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना, (क) प्रि-मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना.<br>[या केंद्र पुरस्कृत योजनांची अंमलबजावणी उच्च व तंत्र शिक्षण (योजना **अ** व **ब** बाबतीत) तसेच, शालेय शिक्षण विभाग (योजना **क** बाबतीत) यांच्याकडून आणि त्यांच्या अधिनस्त असलेल्या नोडल अधिकाऱ्यांकडून करण्यात येते.] |
| कार्यासन ७. | **अर्थसंकल्प विषयक बाबी:-**<br>१)अर्थसंकल्प शाखा,२) अर्थसंकल्पीय अंदाज (सुधारित अर्थसंकल्पासह) व त्या अनुषंगिक इतर सर्व बाबींचे समन्वय.३) कार्यक्रम अंदाजपत्रक तयार करणे ४) वित्त मंत्र्यांचे भाषण<br>**योजना :-**<br>१. केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री जन विकास कार्यक्रम (PMJVK) (पूर्वीची MsDP) |
| कार्यासन ८. | १) ४२ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी दुसरी/ तिसरी पाळी सुरू करणे, २) १५ शासकीय तंत्रनिकेतनांमध्ये अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी दुसरी पाळी सुरू करणे, ३) अल्पसंख्याक समाजातील मुलींसाठी वसतिगृहे योजना राबविणे, ४) अल्पसंख्याकांसाठी नवीन औद्योगिक प्रशिक्षण संस्था उभारणे, ५) अल्पसंख्याकांसाठी नवीन तंत्रनिकेतन संस्था उभारणे,६). रेहमान अभ्यास गट |
| कार्यासन ९. | १)पंतप्रधान नवीन १५ कलमी कार्यक्रम राबविणे २) महिला बचत गट निर्मितीची योजना महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत राबविणे ३)स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजना (S.I.A.C.मार्फत), केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेकरिता पूर्व प्रशिक्षण योजना (यशदामार्फत), ४) निवासी पोलिस भरती पूर्व प्रशिक्षण योजना, ५)मराठी भाषा फौंडेशन वर्ग ६)महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग ७) पंतप्रधान नवीन १५ कलमी कार्यक्रम अंमलबजावणी संदर्भात राज्यस्तरीय संनियंत्रण समिती व जिल्हा अल्पसंख्याक विकास संनियंत्रण समिती (८) अल्पसंख्याक बहुल क्षेत्रासाठी नागरी क्षेत्रात मुलभूत नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी नागरी क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत सहाय्यक अनुदान वाटप करणे (९) अल्पसंख्याक बहुल क्षेत्रासाठी ग्रामीण क्षेत्रात मुलभूत ग्रामीण सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी ग्रामीण क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत सहाय्यक अनुदान वाटप करणे (१०) मौलाना आझाद मोफत शिकवणी संबध्द योजना. (११) अल्पसंख्याक समाजातील लोकांसाठी हेल्प लाईन सुविधा महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगामार्फत उपलब्ध करुन देणे. १२) राज्यातील अल्पसंख्याक समुहातील महिला व युवकांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देणे. १३) विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र जलद विकास कार्यक्रम २०१८ अंतर्गत औरंगाबाद, अमरावती व नागपूर या महसूली विभागातील १५ जिल्ह्यांमध्ये २८०० अल्पसंख्याक महिलांचे बचतगट निर्माण करणे व त्यातील सदस्यांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण दणे. |

## परिशिष्ट-२

## कार्यपूर्तीचे वेळापत्रक

| कार्यासन क्रमांक | विभागाकडून / कार्यालयाकडून पुरविली जाणारी सेवा | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाते | सेवा पुरविणारे अधिकारी / कर्मचारी(अंमलबजावणी यंत्रणा) | सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी व त्याचा दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| का-१ | १)प्रशासकीय विभागाची (खुद्द) आस्थापना,<br>२) विभागातील कर्मचाऱ्यांची रजा, प्रशिक्षण,<br>३) गोपनिय अभिलेख,<br>४) रचना व कार्यपध्दती,<br>५) गोपनिय शाखा, व<br>६) विभागाच्या नियंत्रणाखाली क्षेत्रिय कार्यालयांची स्थापना करणे | महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांचे विनियम व शासकीय कर्तव्ये पार पाडण्यास होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम ,२००५ मधील प्रकरण क्र.३ च्या कलम १०(१) मधील तरतूदीस अनुसरुन,<br>अ) तात्काळ नस्ती शक्यतो त्याच दिवशी किंवा दुसऱ्या दिवशी आणि तातडीच्या स्वरुपाची नस्ती शक्यतो ४ दिवसात निकाली काढण्यात येईल.<br>ब) अन्य विभागाशी संबंधित नसलेल्या नस्तीवर ४५ दिवसांच्या आत व दुसऱ्या विभागाची बाब अंतर्भूत असलेल्या व त्या विभागाचे अभिप्राय आवश्यक असलेल्या नस्तीवर ३ महिन्यांच्या आत निर्णय घेऊन योग्य कार्यवाही करण्यात येईल. | अ) कक्ष अधिकारी (कार्यासन-१) दालन क्र.५२८ (विस्तार), दू.क्र. ०२२-२२८३०६२६<br><br>ब) अवर सचिव (कार्यासन-१) दालन क्र. ७१४ (विस्तार), दू.क्र.०२२-२२८३२२३७ | उप सचिव दालन क्र. ७१५ (विस्तार) ७ वा मजला, मंत्रालय, मुंबई<br>दू.क्र. ०२२-२२८३००३१ |

| कार्यासन क्रमांक | विभागाकडून / कार्यालयाकडून पुरविली जाणारी सेवा | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाते | सेवा पुरविणारे अधिकारी / कर्मचारी(अंमलबजावणी यंत्रणा) | सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी व त्याचा दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| का-२ | १)रोख शाखा,<br>२) सेवापुस्तकांच्या सर्व नोंदी व जतन करणे<br>३) लेखा परीक्षा<br>४) अधिकारी/कर्मचारी यांची वेतन देयके, देयकांचे आहरण व संवितरण | महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांचे बदल्याचे विनियम व शासकीय कर्तव्ये पार पाडण्यास होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील प्रकरण क्र. ३ च्या कलम १०(१) मधील तरतूदीस अनुसरुन, तात्काळ नस्ती शक्यतो त्याच दिवशी किंवा दुसऱ्या दिवशी आणि तातडीच्या स्वरुपाची नस्ती शक्यतो ४ दिवसात निकाली काढण्यात येईल. अन्य विभागाशी संबंधित नसलेल्या नस्तीवर ४५ दिवसांच्या आत व दुसऱ्या विभागाची बाब अंतर्भूत असलेल्या व त्या विभागाचे अभिप्राय आवश्यक असलेल्या नस्तीवर ३ महिन्यांच्या आत निर्णय घेऊन योग्य कार्यवाही करण्यात येईल. | अ) कक्ष अधिकारी (कार्यासन-२)<br>दालन क्र. ५२८-अे (विस्तार),<br>दूरध्वनी क्र. ०२२-२२८३०६२६<br><br>ब) अवर सचिव (कार्यासन-२)<br>दालन क्र. ७१४ (विस्तार),<br>दू.क्र.०२२-२२८३२२३७ | उप सचिव<br>दालन क्र. ७१५(विस्तार)<br>७ वा मजला, मंत्रालय, मुंबई<br>दू.क्र. ०२२-२२८३००३१ |
| का-३ | १)नोंदणी शाखा<br>२) टपाल आवक/जावक,<br>३) गृह व्यवस्थापन,<br>४) अभिलेखांचे जतन<br>५)केंद्र शासनाच्या अति-महत्त्वाच्या व्यक्तींसाठी राजशिष्टाचार देण्याबाबतची प्रकरणे,<br>६) विधानमंडळ कामकाज समन्वय,<br>७)विधानमंडळ समित्या,<br>८)समन्वय कक्ष,<br>९) संकीर्ण, बैठका इ. | | अ) कक्ष अधिकारी, (कार्यासन-३)<br>दालन क्र.५२८-अ (विस्तार),<br>दूरध्वनी क्र. ०२२-२२०२४४०८<br><br>ब) अवर सचिव (कार्यासन-३)<br>दालन क्र. ५२६-अ (विस्तार),<br>दू.क्र. ०२२-२२०२४४०८ | उप सचिव (कार्यासन-३)<br>दालन क्र. ७१५ (विस्तार)<br>७ वा मजला, मंत्रालय, मुंबई<br>दू.क्र. ०२२-२२८३००३१ |

| कार्यासन क्रमांक | सेवांचा तपशिल | सेवा पुरविणारे अधिकारी / कर्मचारी(अंमलबजावणी यंत्रणा) | सेवा पुरविण्याची विहित मुदत | सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी व त्याचा दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| का-४ | वक्फ मालमत्तेचे संरक्षण करणे<br>वक्फ मालमत्तेचा विकास करणे<br>वक्फ संस्थांच्या व्यवस्थापन समित्यांचे तंटे सोडविणे व त्यावर नियंत्रण ठेवणे<br>वक्फ संस्थांची व त्या संस्थांच्या संपत्तीची वक्फ म्हणून नोंदणी करणे<br>वक्फ संस्था/संपत्ती बाबतच्या तक्रारींचे निवारण करणे | महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद | वक्फ अधिनियम, १९९५ मधील तरतुदीनुसार करावयाची अर्धन्यायिक स्वरुपाची कामे असल्याने कालावधी निश्चित करणे शक्य नाही. | मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पनचक्की, औरंगाबाद<br>दूरध्वनी क्रमांक : (०२४०) २४०२३६६<br>ई-मेल-<br>ceomsbw@gmail.com |

| कार्यासन क्रमांक | सेवांचा तपशिल | सेवा पुरविणारे अधिकारी / कर्मचारी (अंमलबजावणी यंत्रणा) | सेवा पुरविण्याची विहित मुदत | सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी व त्याचा दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| का-५ | अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांना धार्मिक/ भाषिक अल्पसंख्याक दर्जा प्रदान करणे. | सक्षम प्राधिकारी तथा उप सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.<br>दुरध्वनी- (०२२) २२८३००३१ | परिपूर्ण अर्ज<br>९० दिवस | सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय मुंबई.<br>दुरध्वनी- (०२२) २२०२५२६४ |
| | **महाराष्ट्र राज्य हज समिती:-**<br>अ) हज यात्रेसाठी जाऊ इच्छिणाऱ्यांना हज यात्रेचे फॉर्म वितरित करणे, फॉर्म स्वीकारणे, संगणकामध्ये नोंद करणे, ड्रॉद्वारे हज यात्रेकरुची निवड करणे.<br>ब) हज यात्रेस गेलेल्या यात्रेकरुंच्या मदतीसाठी खादीमुल हुज्जाजच्या प्रतिनियुक्तीची केंद्रशासनास शिफारस करणे. | कक्ष अधिकारी, महाराष्ट्र राज्य हज समिती, मुंबई | केंद्रीय हज समितीकडून हज यात्रेसाठी घोषित करण्यात येणाऱ्या Haj Action Plan मधील वेळापत्रकानुसार. | कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य हज समिती, मुंबई.<br>दुरध्वनी-(०२२) २२८३००३१ |
| | मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाच्या | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | योजना:-<br>कर्ज प्रकरणे (थेट कर्ज योजना, मुदत कर्ज योजना,शैक्षणिक कर्ज योजना, सूक्ष्म पत पुरवठा योजना इ.) | | | |
| | १) कर्ज प्रकरणे स्विकारणे | जिल्हा व्यवस्थापक, मौलाना आझाद अ. आ. वि. महामंडळ | परिपूर्ण अर्ज त्याच दिवशी | व्यवस्थापकीय संचालक, मौलाना आझाद अ. आ. वि. महामंडळ, मुंबई |
| | २) कर्ज प्रकरणांची छाननी | जिल्हा व्यवस्थापक, मौलाना आझाद अ. आ. वि. महामंडळ | ३० दिवस | |
| | ३) छाननी केलेले अर्ज मुख्यालयास पाठविणे | जिल्हा व्यवस्थापक, मौलाना आझाद अ. आ. वि. महामंडळ | मुख्यालयातून मागणी केल्यावर | |
| | ४) कर्ज मंजूरी पत्र पाठविणे | जिल्हा व्यवस्थापक, मौलाना आझाद अ. आ. वि. महामंडळ | कर्ज मंजूर झाल्यानंतर १५ दिवस | |

| कार्यासन क्रमांक | विभागाकडून / कार्यालयाकडून पुरविली जाणारी सेवा | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाते | सेवा पुरविणारे अधिकारी / कर्मचारी (अंमलबजावणी यंत्रणा) | सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी व त्याचा दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| का-६ | अल्पसंख्याक विद्यार्थी बहुल शाळांना पायाभूत सुविधा पुरविणे | अल्पसंख्याक विकास विभागामार्फत इच्छुक शाळांकडून प्रस्ताव मागविण्यात येतात. त्यानुसार विहित मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जाची संबंधीत जिल्ह्यातील जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय निवड समितीमार्फत छाननी करण्यात येते व त्यांच्या छाननीनंतर पात्र ठरलेल्या शाळांची यादी शासनाकडे प्राप्त झाल्यानंतर अंतिम मंजूरी शासन स्तरावरून देण्यात येते व अनुदानाचे वाटप जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत दिनांक ३१ मार्च पर्यंत वितरीत करण्यात येते. | संबंधीत जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी | सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग (विस्तार क्र.७०८), मंत्रालय, मुंबई ४०००३२, दुरध्वनी क्र.०२२-२२०२५२६४ |
| | डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना मदरशांच्या आधुनिकीकरणासाठी | अल्पसंख्याक विकास विभागामार्फत इच्छुक मदरसांकडून प्रस्ताव मागविण्यात येतात. त्यानुसार विहित मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जाची संबंधीत जिल्ह्यातील जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय निवड | संबंधीत जिल्हयांचे जिल्हाधिकारी | सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग (विस्तार क्र.७०८), मंत्रालय, मुंबई ४०००३२, दुरध्वनी क्र.०२२-२२०२५२६४ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | पायाभूत सुविधा, ग्रंथालयासाठी अनुदान देणे व शिक्षकांच्या मानधनासाठी अनुदान देण्याची योजना | समितीमार्फत छाननी करण्यात येते व त्यांच्या छाननीनंतर पात्र ठरलेल्या मदरसांची यादी शासनाकडे प्राप्त झाल्यानंतर अंतिम मंजूरी शासन स्तरावरून देण्यात येते व अनुदानाचे वाटप जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत दिनांक ३१ मार्च पर्यंत वितरीत करण्यात येते. | | |
| | उच्च व्यावसायीक व इयत्ता १२ वी नंतर सर्व अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती | अंमलबजावणी यंत्रणेकडून विहित मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी केल्यानंतर अल्पसंख्यांक विकास विभागाकडे निधीची मागणी करण्यात येते. त्यानंतर विभागाकडून अंमलबजावणी यंत्रणेकडे निधी वितरीत करण्यात आल्यानंतर सदर अंमलबजावणी यंत्रणामार्फत पात्र विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये निधी जमा केला जातो. | **तांत्रिक शिक्षण :-** सचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, ३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई.४००००१ दुरध्वनी क्रमांक- ०२२-२२६१७९६९/ ०२२-३०२३३४८६ वेबसाईट www.dtemaharashtra.gov.in<br><br>**वैद्यकीय शिक्षण :-** संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, ४ था मजला शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत , सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई-४००००१ दु.क्र.०२२- २२६२०३६१/६५ वेबसाईट www.dmer.org<br><br>**१२ वी नंतरचे शिक्षण :-** संचालक, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१ दु.क्र.०२०-२६१२६९३९ वेबसाईट www.dhepune.gov.in | सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग (विस्तार क्र.७०८), मंत्रालय, मुंबई ४०००३२, दुरध्वनी क्र.०२२-२२०२५२६४ |

| कार्यासन क्रमांक | विभागाकडून / कार्यालयाकडून पुरविली जाणारी सेवा | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाते | सेवा पुरविणारे अधिकारी / कर्मचारी (अंमलबजावणी यंत्रणा) | सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी व त्याचा दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| का-७ | अर्थसंकल्प शाखा. | - | कक्ष अधिकारी का-७ /(रु. नं. ५२८-ऑ)<br>२२८३०६२६ | सचिव, अल्पसंख्यांक विकस विभाग (विस्तार-७०८) २२०२५२६४<br>अवर सचिव (अर्थसंकल्प शाखा) /(रु. नं. ५२६-ऑ) |
| | केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री जन विकास कार्यक्रम ( PMJVK) | प्रधानमंत्री जन विकास कार्यक्रम (PMJVK) हा अल्पसंख्याक बहुल क्षेत्रातील अल्पसंख्यांक समुदायांना विशेषत: शिक्षण, आरोग्य आणि कौशल्य विकास क्षेत्रात चांगल्या सामाजिक आर्थिक पायाभूत सुविधा पुरविण्याच्या उद्देशाने सूरू करण्यात आला आहे. ज्यामुळे राष्ट्रीय सरासरी आणि अल्पसंख्यक समुदायांमधील मागासलेपणाची दरी कमी होण्यास मदत होईल.<br>प्रधानमंत्री जन विकास कार्यक्रमाच्या पूर्वी, केंद्र शासनाद्वारे २००८-०९ या वर्षा पासून बहु-क्षेत्रीय विकास कार्यक्रम राबविण्यात आला. तदनंतर २०१८ पासून प्रभावी अंमलबजावणीसाठी पूर्वीच्या बहु-क्षेत्रीय विकास कार्यक्रमा (MsDP) ची पुनर्रचना व नामकरण पंतप्रधान जन विकास कार्यक्रम असे करण्यात आले आहे.<br>सदर योजने अंतर्गत सन २०२१-२२ पासून राज्यातील सर्व जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला आहे. | १. कक्ष अधिकारी का-७ /(रू. नं.५२८-ऑ) २२८३०६२६<br><br>२. राज्यातील सर्व जिल्ह्याचे जिल्हाधिकारी.<br>मुंबई उपनगर - ०२२-२६५१४७४२<br>मुंबई शहर -०२२-२२६६२४४०<br>परभणी ०२४५२-२२३५५५<br>लातूर ०२३८२-२२४००१<br>उस्मनाबाद ०२४७२-२२४५०१<br>नांदेड ०२४६२-२३७१०१<br>हिंगोली ०२४५६-२२१७०१<br>जालना ०२४८२-२२४७००<br>औरंगाबाद ०२४०-२३३१२००<br>चंद्रपूर ०७१७२-२५५३००<br>रत्नागिरी ०२३५२-२२२३०१<br>नाशिक ०२५३-५७७८५००<br>नंदुरबार ०२५६४-२२१००१<br>धूळे ०२५६२-२८८७०१<br>जळगाव ०२५७-२२२०४००<br>नागपूर ०७१२-२५६४९७३<br>यवतमाळ ०७२३२ -२४२५०१<br>बुलडाणा ०७२६२-२३२४०७<br>अहमदनगर ०२४१-२३४५००१<br>अकोला ०७२४-२४२४४४२<br>वाशिम ०७२५२-२३३४००<br>अमरावती ०७२१-२६६२५२२<br>सांगली ०२३३-२३७३००१ | सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग ( विस्तार -७०८) २२० २५२६४<br>अवर सचिव ( अर्थसंकल्प शाखा ) /रू.नं.५२६ -ए ) |
| | केंद्र पुरस्कृत | प्रस्तूत कार्यक्रम केंद्र | राज्य व्यवस्थापन कक्ष, | सचिव, अल्पसंख्याक |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामिण) . | शासनामार्फत राबविण्यात येत असून कार्यक्रमांतर्गत उद्दीष्टे, ही राज्य शासनाच्या संबंधित प्रशाकीय विभागास थेट देण्यात येतात. अल्पसंख्याक विकास विभाग हा कार्यक्रमांचे समन्वय करतो. | ग्रामिण गृहनिर्माण सिडको भवन, (दक्षिण कक्ष) ५ मजला, सीबिडी बेलापूर. | विकास विभाग ( विस्तार -७०८) २२० २५२६४ अवर सचिव ( अर्थसंकल्प शाखा ) /रू.नं.५२६ -ए ) |

| कार्यासन क्रमांक | सेवांचा तपशिल | सेवा पुरविणारी अधिकारी / कर्मचारी(अंमलबजावणी यंत्रणा) | सेवा पुरविण्याची विहित मुदत | सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी व त्याचा दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| का.८ | १५ शासकीय तंत्रनिकेतन संस्थांमध्ये अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी दुसरी पाळी सुरू करणे (उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा शासन निर्णय दि.१३ सप्टेंबर, २०११, दि.१९ जुलै, २०१२ व दि.८ जुलै, २०१४) | प्राचार्य, संबंधित शासकीय तंत्रनिकेतन संस्था | प्रवेशाच्या वेळापत्रकानुसार | संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई |
| | अल्पसंख्याक समाजातील मुलींसाठी वसतिगृहे योजना राबविणे (अल्पसंख्याक विकास विभागाचा शासन निर्णय दि.२ मार्च, २०१० व दि.२१ जून, २०१३) | बांधकामाबाबत- संबंधित जिल्ह्याचे कार्यकारी अभियंता व्यवस्थापनाबाबत -प्राचार्य/ संचालक, संबंधित वसतिगृहे | प्रवेशाच्या वेळापत्रकानुसार | संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी |
| | नवीन औद्योगिक प्रशिक्षण संस्था उभारणे (शासन निर्णय दि.२ फेब्रुवारी, २०१०) | संबंधित कार्यकारी अभियंता | | संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई |
| | नवीन तंत्रनिकेतन संस्था उभारणे (शासन निर्णय दि.६ जून, २०१५) | संबंधित कार्यकारी अभियंता | | संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई |

| का. क्र. | विभागाकडून/कार्यालयाकडून पुरविली जाणारी सेवा | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाते | सेवा पुरविणारे अधिकारी/कर्मचारी, अंमलबजावणी यंत्रणा | सेवा विहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी व त्याचा दूरध्वनी क्र. |
|---|---|---|---|---|
| का-९ | पंतप्रधान नवीन १५ कलमी कार्यक्रम (केंद्र शासन पुरस्कृत कार्यक्रम) | प्रस्तूत कार्यक्रम केंद्र शासनामार्फत राबविण्यात येत असून कार्यक्रमांतर्गत उद्दिष्टे, ही राज्य शासनाच्या संबंधित प्रशासकीय विभागास थेट देण्यात येतात. अल्पसंख्याक विकास विभाग हा कार्यक्रमाचे समन्वय करतो. | संबंधित जिल्हाधिकारी/मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | संबंधित विभागंच्या सचिवांचे दूरध्वनी क्रमांक<br>१)०२२-२२०२७०५०-प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग<br>०२०-२६३३००४०/४२, संचालक, ICDS<br>२) ०२२-२२०२५२९२-प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग<br>३) ०२२-२२०२५२९२ प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग<br>४) ०२२-२२०२५२९२-प्रधान सचिव शालेय शिक्षण विभाग<br>५) ०२२-२२०२५२९२ प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग व ०२२-२२०२५३०१ प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण<br>६) ०११-२३५८३७८८/२३५८३७८९-MAEF (मदत व पुनर्वसन)<br>७) ०२२-२२०२५२०१-प्रधान सचिव ग्रामविकास व ०२२-२२०२६४१९-प्रधान सचिव नगरविकास<br>८) ०२२-२२०२५३०१-प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण<br>९) ०२२-२२८३७५०९-उप |

| कार्यक्रमांतर्गत योजना | संबंधित विभाग | जिल्हा | जिल्हाधिकारी | मुख्य कार्यकारी अधिकारी |
|---|---|---|---|---|
| १) एकात्मीकृत बालविकास सेवांची समन्याय उपलब्धता<br>२) शालेय शिक्षण प्रवेशासंबंधात सुधारणा करणे<br>३) ऊर्दू शिकविण्यासाठी बृहद्तर साधने<br>४) मदरसा शिक्षणाचे आधुनिकीकरण<br>५) अल्पसंख्याक समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्त्या<br>६) मौलाना आझाद शिक्षण प्रतिष्ठानामार्फत पायाभूत शैक्षणिक सुविधा सुधारणे<br>७) गरीबांसाठी स्वयंरोजगार व दैनिक रोजंदारी<br>८) तांत्रिक प्रशिक्षणाव्दारे कौशल्याची दर्जावाढ<br>९) आर्थिक | १) महिला व बालविकास विभाग<br>२) शालेय शिक्षण विभाग<br>३) शालेय शिक्षण विभाग<br>४) शालेय शिक्षण विभाग<br>५) शालेय शिक्षण विभाग व उच्च व तंत्र शिक्षण विभाग<br>६) मौलाना आझाद शिक्षण प्रतिष्ठान<br>७) ग्रामविकास विभाग व नगरविकास विभाग<br>८) उच्च व तंत्र शिक्षण विभाग<br>९) राष्ट्रीय अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ व मौलाना आझाद अल्पसंख्याक | मुंबई शहर | २६६२४४० | - |
| | | मुंबई उपनगर | २६५१४७४२ | - |
| | | ठाणे | २५३४४०४१ | २५३३२७९६ |
| | | रायगड | ०२१४१-२२२००१ | २२२०२४ |
| | | रत्नागिरी | ०२३५२-२२२३०१ | २२२३८६ |
| | | सिंधुदूर्ग | ०२३६२-२२८८४४ | २२८८०७ |
| | | नाशिक | ०२५३-२५७५५०० | २५९६९५७ |
| | | धुळे | ०२५६२-२८८७०१ | २३७७०१ |
| | | जळगावं | ०२५७-२२२०४०० | २२२३११४ |
| | | नंदुरबार | ०२५६४-२२१००१ | २१०२२१ |
| | | अहमदनगर | ०२४१-२३४५००१ | २३५५२१९ |
| | | पुणे | ०२०-२६११४९४९ | २६१३४३१३ |
| | | सोलापूर | ०२१७-२७३१००० | २६२५५०० |
| | | सातारा | ०२१६२-२३२७५० | २३०६८८ |
| | | सांगली | ०२३३-२२७३००१ | २३७००८ |
| | | कोल्हापूर | ०२३१-२६५४८११ | २६५५५९८ |
| | | नागपूर | ०७१२-२५६४९७३ | २५६१४६१ |
| | | भंडारा | ०७१८४-२५४७७७ | २५२३३१ |
| | | वर्धा | ०७१५२-२४०१०२ | २४०२३१ |
| | | चंद्रपूर | ०७१७२-२५५३०० | २५६४०१ |
| | | गडचिरोली | ०७१३२-२२२००१ | २२२३०४ |
| | | गोंदिया | ०७१८२-२३६१४९ | २२१८५५ |
| | | अमरावती | ०७२१-२६६२५२२ | २६६२९२६ |
| | | अकोला | ०७२४-२४२४४४२ | २४३५२१३ |
| | | यवतमाळ | ०७२३२-२४२५०१ | २४४२५१ |
| | | वाशिम | ०७२५२-२३३४०० | २३२८६१ |
| | | बुलढाणा | ०७२६२-२४२३०७ | २४२३०९ |
| | | औरंगाबाद | ०२४०-२३३१२०० | २३३१२१९ |
| | | जालना | ०२४८२-२२४७०० | २२५७९२ |
| | | परभणी | ०२४५२-२२३५५५ | २४२९०० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कार्यक्रमाकरिता कर्जाचे पाठबळ वाढविणे<br>१०) राज्य आणि केंद्रिय सेवांसाठी सेवा भरती<br>११) ग्रामीण गृहनिर्माण योजनेत समन्याय वाटा<br>१२) अल्पसंख्याक वास्तव्य करीत असलेल्या झोपडपटटयांच्या स्थितीत सुधारणा करणे<br>१३) जातीय घटनांना प्रतिबंध<br>१४) जातीय अपराधांकरिता खटला<br>१५) जातीय दंगलींना बळी पडलेल्यांचे पुनर्वसन | आर्थिक विकास महामंडळ<br>१०) संबंधित विभागाचे नियुक्ती प्राधिकारी<br>११) ग्रामाविकास विभाग<br>१२) नगरविकास विभाग<br>१३) गृह विभाग<br>१४) गृह विभाग<br>१५) मदत व पुनर्वसन विभाग | नांदेड<br>बीड<br>उस्मानाबाद<br>हिंगोली<br>लातूर<br>पालघर | ०२४६२-२३७१०१<br>०२४४२-२२२२०१<br>०२४७२-२२४५०१<br>०२४५६-२२१७०१<br>०२३८२-२४४००१<br>०२५२५-२५३१११ | २३४२०७<br>२२२३२३<br>२२२८४०<br>२२१८२६<br>२४२९७० | सचिव अल्पसंख्याक विकास<br>१०) सर्व मंत्रालयीन विभाग<br>११) ०२२-२२०२५२०१- सचिव, ग्रामविकास विभाग<br>१२) ०२२-२२०२६४१९- प्र.स., नगरविकास विभाग<br>१३) ०२२-२२०२९९५९- अपर मुख्य सचिव, गृह विभाग<br>१४) ०२२-२२०२९९५९- अपर मुख्य सचिव गृह विभाग<br>१५) ०२२-२२०२३०३९- अ.मु.स., म.व.व. विभाग (मदत व पुनर्वसन) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| का-९ | निवासी पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम | अल्पसंख्याक समुदायातील उमेदवारांना वर्षातून ३ महिन्याचे निवासी पोलिस भरती पूर्व प्रशिक्षण देणे.(पोभप्र-२०१५/प्र.क्र.२१३/का-९, दि.१७.१२.२०२१) | सर्व जिल्हाधिकारी | सचिव, अल्पसंख्यांक विकस विभाग (विस्तार-७०८) २२०२५२६४ |
| का-९ | मराठी भाषा फौंडेशन वर्ग योजना | अमराठी शाळेत शिकणाऱ्या ८ वी ९ वी आणि १० वीच्या अल्पसंख्याक विदयार्थ्यांसाठी मराठी भाषेचे ज्ञान प्राप्त होण्याकरीता मराठी फौंडेशन वर्ग घेण्यात येतात. सदर योजना संचालक, अल्पसंख्याक व प्रौढ शिक्षण संचालनालय, पुणे यांच्यामार्फत राबविण्यात येते | संचालक, अल्पसंख्याक व प्रौढ शिक्षण संचालनालय, पुणे. | सचिव, अल्पसंख्यांक विकस विभाग (विस्तार-७०८) २२०२५२६४श् |
| का-९ | केंद्रिय लोकसेवा आयोग स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण योजना | अल्पसंख्याक उमेदवारांचे शासकीय सेवेतील प्रमाण उंचावण्यासाठी स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजना कार्यान्वित केलेली आहे. यशदा, पुणे व संचालक राज्य प्रशासकीय प्रशिक्षण संस्थांव्दारे निवड पध्दतीने उमेदवारांना प्रशिक्षण देण्यात येते. (शासन निर्णय क्र. अविवि २००९/ | १) महासंचालक, यशदा, पुणे (०२०-२५६०८०००)<br>२) संचालक राज्य प्रशासकीय प्रशिक्षण संस्था, मुंबई -०२२-२२०७०९४२<br>औरंगाबाद-०२४०-२३३२२१०<br>नागपूर-०७१२-२५६५६२६<br>कोल्हापूर-०२३१-२५२८३५१ | सचिव, राज्य अल्पसंख्याक आयोग, जे.जे. स्कूल ऑफ आर्टसच्या मागे, मुंबई -१. (०२२-२२६५००८५) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | प्र.क्र.२३४/०९/का-९ दि. २०/०३/२०१०) | | |
| का-९ | मौलाना आझाद मोफत शिकवणी व संबध्द योजना | राज्यातील अल्पसंख्याक लोकसमुहातील उमेदवारांना शासकीय/निमशासकीय सेवेत रोजगाराच्या पुरेशा संधी उपलब्ध करुन देण्याकरिता केंद्रीय लोकसेवा आयोग/महाराष्ट्र लोकसेवा आयोग/बँकिग सेवा, इत्यादी स्पर्धा परिक्षांसाठी प्रशिक्षण तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमांमधील प्रवेशाकरिता घेण्यात येणा-या सामाईक प्रवेश परीक्षांच्या पूर्वतयारीसाठी प्रशिक्षण आणि इयत्ता १० वी व १२ वी अनुत्तीर्ण अल्पसंख्याक उमेदवारांकरिता विशेष शिकवणी वर्ग सुरु करण्यासाठी.(शासन निर्णय क्रमांक-राअआ-२०१२/१०८/प्र.क्र.१८/का.९, दिनांक-२५/०६/२०१३) व शा.नि.दि.२७.०६.२०१८ | कक्ष अधिकारी/ अवर सचिव (का.९), अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई. ०२२-२२०२५४०८ | उप सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२. (०२२-२२८३००३१) |
| का-९ | नागरी क्षेत्र विकास कार्यक्रम | केंद्र शासनाने निश्चित केलेल्या महाराष्ट्रातील ४३ अल्पसंख्याक बहुल क्षेत्रासाठी प्राधान्याने तसेच ज्या शहरांच्या एकूण लोकसंख्येपैकी अल्पसंख्याकांची लोकसंख्या किमान १०% पेक्षा जास्त अशी शहरे तथा म.न.पा, न.पा., न.प. यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील अल्पसंख्याक बहुल क्षेत्रात अनुज्ञेय मूलभूत नागरी सोयी सुविधांसाठी विहित मर्यादेत अनुदान उपलब्ध करुन देण्यात येते. शासनाने विहित केलेल्या नमून्यात व विहीत कालमर्यादेत संबंधित यंत्रणांनी जिल्हाधिकाऱ्यामार्फत शासनाकडे अद्ययावत प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.(संदर्भ शासन निर्णय दि.१८.०६.२०१५) त्याचबरोबर शासन पूरक पत्र दि.०९.०३.२०१६ नुसार खासदार व आमदार यांच्याकडून शासनाकडे प्रस्ताव सादर केले जातात. | अंमलबजावणी यंत्रणा संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी | उप सचिव (का.-९) अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई दूरध्वनी क्र.(०२२) २२८३००३१ |
| का-९ | ग्रामीण क्षेत्र विकास कार्यक्रम | राज्यातील ज्या ग्रामपंचायतीच्या एकूण लोकसंख्येपैकी अल्पसंख्याकांची लोकसंख्या किमान १०० किंवा त्यापेक्षा जास्त अशा अल्पसंख्याक बहुल ग्रामपंचायतींना अनुज्ञेय मूलभूत तथा पायाभूत सोयी सुविधांसाठी प्रति ग्रामपंचायत कमाल रु.१० लाखापर्यंत अनुदान उपलब्ध करुन देण्यात येते संबंधित यंत्रणांनी शासनाने विहित केलेल्या कालमर्यादेत, | अंमलबजावणी यंत्रणा संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी | उप सचिव (का.-९) अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई दूरध्वनी क्र.(०२२) २२८३००३१ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | विहीत नमुन्यात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व जिल्हाधिकारी यांचे मार्फत शासनाकडे अद्ययावत प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.. (संदर्भ शासन निर्णय दि.२२.०९.२०१५) त्याचबरोबर शासन पूरक पत्र दि.०९.०३.२०१६ नुसार खासदार व आमदार यांच्याकडून शासनाकडे प्रस्ताव सादर केले जातात. | | |
| का-९ | संशोधन प्रशिक्षण व प्रसिध्दी कार्यक्रम. | या योजनेंतर्गत राज्यातील अल्पसंख्याकांच्या विविध समस्या विषयक बाबींवर संशोधन करून उपाययोजना सुचविण्यात येतात. तसेच अल्पसंख्याकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे व त्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणणे या विषयावर राज्य प्रशासनातील जबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये जागरुकता निर्माण करण्यासाठी त्यांना यशदा, पुणे या संस्थेमार्फत प्रशिक्षण देण्यात येते.<br>राज्यातील अल्पसंख्याकांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांबाबतची माहिती राज्यातील जनसामान्यापर्यंत पोहोचावी या उद्देशाने या सर्व योजनांना महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगामार्फत दूरदर्शन व राज्यातील सर्व भाषांमधील प्रमुख वृत्तपत्रे यांच्या माध्यमातून व्यापक प्रसिध्दी देण्यात येते. (संदर्भ शासन निर्णय, दि.०५.०२.२००९) | अंमलबजावणी यंत्रणा सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई | उप सचिव (का.-९) अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई दूरध्वनी क्र.(०२२) २२८३००३१ |
| का-९ | हेल्प लाईन | राज्यातील अल्पसंख्याकांना शासनाच्या अल्पसंख्याक विषयक विविध धोरणात्मक निर्णयाबाबत अवगत करण्याकरिता, त्यांना दैनंदिन जीवनात सामोऱ्या जाव्या लागणाऱ्या अडचणींच्या दृष्टिने त्यांच्या गाऱ्हाण्यांचे निराकरण करण्याकरिता तसेच राज्य शासन राज्यातील अल्पसंख्याकांकरिता राबवित असलेल्या विविध विकास योजनांबाबत अचूक माहिती देण्यासाठी व त्यानुंषगाने त्यांच्या शंकांचे निरसन करण्याकरिता महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाच्या कार्यालयात एक हेल्पलाईन सुविधा कक्ष स्थापन करण्यात आला आहे. हेल्पलाईन क्रमांक २२६५००२५/२६ असा आहे. (संदर्भ शासन निर्णय दि.०५.०२.२००९) | अंमलबजावणी यंत्रणा सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई | उप सचिव (का.-९) अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई दूरध्वनी क्र.(०२२) २२८३००३१ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| का-९ | राज्यातील अल्पसंख्याक लोकसमूहातील महिलांसाठी स्वयंसहाय्यता बचतगट | अल्पसंख्याक लोकसमूहातील महिलांचे आर्थिक सक्षमीकरण करुन त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अल्पसंख्याक बहुल क्षेत्रांमध्ये मुस्लिम, ख्रिश्चन, सिख, बौद्ध, जैन, पारशी व ज्यू या लोकसमूहातील महिलांचे स्वयंसहाय्यता बचतगट स्थापन करण्यास शासन निर्णय दि.२८.०२.२०१२ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. या योजनेंतर्गत पहिल्या टप्प्यात मुंबई महानगरक्षेत्र (मुबई शहर व उपनगर) नांदेड, मालेगांव, कारंजा, परभणी, पुणे, नागपूर, औरंगाबाद, भिंवंडी, मुंब्रा-कौसा, मिरज या ११ शहरामध्ये बचतगट स्थापन करण्यास परवानगी देण्यात आली आहे. सदर योजनेस शासन निर्णय दि.०१.१०.२०२० अन्वये ५ वर्षे मुदतवाढ देण्यात आली आहे. | अंमलबजावणी यंत्रणा- महाव्यवस्थापक, महिला आर्थिक विकास महामंडळ मर्या., गृहनिर्माण भवन, (म्हाडा), पोटमाळा, कलानगर, वांद्रे, मुंबई-५१ दुरध्वनी क्र.०२२-२६५९१२१३/ २६५९१६२९ / २६५९०५७४ | उप सचिव (का.-९) अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई दूरध्वनी क्र.(०२२) २२८३००३१ |
| | राज्यातील अल्पसंख्याक समुहातील महिला व युवकांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देणे | राज्यातील अल्पसंख्याक महिला व युवकांना स्वयंरोजगार, उद्योगक्षम करण्याकरिता त्यांना रोजगाराची संधी प्राप्त होण्याकरिता कौशल्य विकास विभागांतर्गत असलेल्या महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई मार्फत कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देण्यात येते. | अंमलबजावणी यंत्रणा-महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई | कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई. |
| | राज्यातील औरंगाबाद, अमरावती व नागपूर या महसूली विभागातील १५ जिल्ह्यांमध्ये अल्पसंख्याक महिला बचतगट निर्माण करणे व त्यातील सदस्यांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देणे. | विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र जलद विकास कार्यक्रम २०१८ अंतर्गत औरंगाबाद, अमरावती, नागपूर या महसूली विभागातील औरंगाबाद, हिंगोली, जालना, उस्मनाबाद, लातूर, बीड, चंद्रपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, अमरावती, अकोला, बुलढाणा व यवतमाळ या १५ जिल्ह्यांमध्ये अंदाजे २८०० बचतगट निर्माण करुन त्यातील सदस्यांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देणे ही योजना शासन निर्णय, दि.२४.११.२०२२ अन्वये सुधारित स्वरुपात व सन २०२०-२१ ते सन २०२७-२८ या ७ वर्षाच्या कालावधीमध्ये राबविण्यात येणार आहे. | अंमलबजावणी यंत्रणा- महिला आर्थिक विकास महामंडळ मर्या., मुंबई व महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई | उप सचिव (का.-९) अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई दूरध्वनी क्र.(०२२) २२८३००३१ |